देशांतर्गत जिल्हयातील मच्छिमारांना नायलॉन
सूत व शेवसूत देण्यात येणारे अनुदान.

महाराष्ट शासन
कृषि व सहकार विभाग
शासन निर्णय क्रमांकः-मत्स्यवि-२८७०/१५०५७/ग
मंत्रालय,मुंबई-४०० ०३२.
दिनांकः- २०/१२/१९७१.

**पहाः-** १) क्रमांकःएफडीएक्स २८६६/३९७६१/ग, दिनांक १९.६.१९६७.
२) क्रमांकःएफएलए-१०६५/२२१८५/ग, दिनांक ३०.५.१९६७.

**निर्णयः-** ''मच्छिमार साधनावर अनुदान'' या योजनेखाली नायलॉन सुतावर व शेवसुतावर (कॉटन व्टाईन) शासन निर्णय क्रमांक एफडीएक्स-२८६६/३९७६१/ग,दिनांक १९/६/१९६७ व एफएलए १०६५/२२१८५/ग, दिनांक ३०/५/१९६७ अनुसार देण्यात येणाऱ्या अनुक्रमे ५० टक्के व २५ टक्के अनुदानाबाबत नायलॉन सूताचे बाबतीत एक किलोला रु.१९.५० व शेवसूताच्या बाबतीत एक किलोला रु.२ अशी आार्थिक कमाल मर्यादा घालून दिलेली होती. तथापि आता नायलॉन सूत व शेवसूताच्या किंमती वाढत असल्याने देशाअंतर्गत मच्छिमारांना ५० टक्के आणि २५ टक्के या टक्केवारीचा प्रत्यक्ष फायदा अशा कमाल मर्यादेच्या अटींमुळे मिळू शकत नाही म्हणून ही कमाल मर्यादा वाढवून मिळावी अशी शिफारस महाराष्ट्र मत्स्यव्यवसाय सल्लागार मंडळाने शासनास केली होती.

२. शासनाने वरील परिस्थिती तसेच देशाअंतर्गत मच्छिमारांची आार्थिक परिस्थिती लक्षात घेऊन टक्केवारीचा प्रत्यक्ष फायदा मच्छिमारांना उपलब्ध करुन देण्यासाठी आता असा निर्णय घेतला आहे की नायलॉन सूत व शेवसूत यावर उपलब्ध असलेल्या अनुक्रमे ५० टक्के व २५ टक्के अनुदानाच्या बाबतीत घालण्यात आलेल्या रकमेसंबंधीच्या कमाल मर्यादा आता पूर्णपणे काढूनटाकाव्या आणि देशातंर्गत मच्छिमारांना यापुढे नायलॉन सूतावर व शेवसूतावर प्रती किलोच्या खरेदीच्या किंमतीच्या अनुक्रमे ५० टक्के व २५ टक्के अनुदान देण्यात यावे.

३. तसेच मोनोफिलामेंट सिथेंटीक व्टाईनवरही देशांतर्गत मच्छिमारांना खरेदीच्या किंमतीच्या ५० टक्के अनुदान देण्यासही शासन समत्ती देत आहे.

४. मच्छिमारांच्या उपरोक्त साधनांवर अनुदान देण्यासाठी प्रचलित असलेल्या पुढील अटी तशाच चालू ठेवण्यात येत आहेत.

१) प्रतिवर्षी प्रत्येक मच्छिमाराला प्रत्येक प्रकारचे सूतावर (नायलॉन,सूत शेवसूत व मानोफिलामेंट व्टाईन द्यावयाचे अनुदान ५ किलो पर्यंतच राहील.

२) जिल्हा किंवा शिखर संघातर्फे वाटप केलेल्या सूतावरच वरील अनुदान उपलब्ध होईल.

५. वर नमूद केलेल्या अनुदानावरील खर्च ''३५ उद्योग सी मत्स्यव्यवसाय राज्य योजनांतर्गत योजना सी ३२ (६) (ए) मत्स्यव्यवसायाला उपयुक्त असलेल्या वस्तूंचा पुरवठा आणि (६)(बी) जलदगती डिझेल तेलाबाबत अनुदान देणे'' या लेखा शीर्षाखाली खर्ची घालून एकूण कमी केलेल्या तरतूदीमधून भागविण्यात यावा.

६. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने व त्या विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.१६८७८/६९९/१, दिनांक १.१०.७१ ला अनुसरुन निर्गमित करण्यांत येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

सही/-
(द.आ.मुंगरे)
अवर सचिव,
कृषि व सहकार विभाग,

<u>प्रत अग्रेषितः-</u>

मत्स्यव्यवसाय संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
उपसंचालक, मत्स्यव्यवसाय, नागपूर, मुंबई
सहाय्यक मत्स्यव्यवसाय संचालक, नागपूर, औरंगाबाद, पुणे व मुंबई.
अधिक्षक, मत्स्यव्यवसाय, नागपूर, चंद्रपूर, भंडारा, अकोला, पूणे कोल्हापूर, नाशिक औरंगाबाद व नांदेड
सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, पुणे
महालेखापाल, मुंबई/नागपूर.
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
वित्त विभाग.